# उप जिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ

दुरध्वनी क्रमांक – 07232-273105
ई-मेल : dydeoyavatmal@gmail.com


क्रमांक/महसूल सहा./सानि/कावि/654/2025. दिनांक 29/09/2025.

निवडणूक महत्वाचे

**प्रति,**

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, यवतमाळ.**

**विषय:-** **अमरावती विभागातील शिक्षक मतदार संघात मतदार नोंदणी कार्यक्रम जाहिर सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

**संदर्भ :-**
१. मा. भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.322/LC/G&T/E-ROLL-BIEN दिनांक १२ सप्टेंबर, २०२५.
२. मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक: ईएलआर-२०२५/प्र.क्र.८७/निवडणूक-६, दिनांक १२ सप्टेंबर, २०२५.
३. मा. विभागीय आयुक्त तथा मतदार नोंदणी अधिकारी, अमरावती विभाग शिक्षक मतदार संघ, अमरावती यांचे पत्र क्रमांक/अ.आ (सा.प्र.)/जी.बी.४/ शिक्षक निवड./प्र.क्र.२७५/२०२५ दिनांक २६ सप्टेंबर, २०२५.

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्रान्वये मा. भारत निवडणूक आयोगाने दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित अमरावती विभागात शिक्षक निवडणूक मतदार संघाच्या मतदार याद्या नव्याने तयार करणेबाबतचा कार्यक्रम घोषित केलेला आहे, तो खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पुनरिक्षण कार्यक्रमाचे टप्पे | कालावधी |
|---|---|---|
| १. | मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१ (३) अन्वये जाहीर सुचना प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि. ३० सप्टेंबर, २०२५ (मंगळवार) |
| २. | मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१ (४) अन्वये वर्तमान पत्रातील नोटीसीची प्रथम पुर्नप्रसिध्दी | दि. १५ ऑक्टोंबर, २०२५ (बुधवार) |
| ३. | मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१ (४) अन्वये वर्तमान पत्रातील नोटीसीची व्दितीय पुर्नप्रसिध्दी | दि. २५ ऑक्टोंबर, २०२५ (शनिवार) |
| ४. | प्रकरणपरत्वे नमुना १८ किंवा १९ व्दारे दावे व हरकती स्वीकारण्याचा अंतिम दिनांक | दि. ०६ नोव्हेंबर, २०२५ (गुरूवार) |
| ५. | हस्तलिखिते तयार करणे व प्रारूप मतदार यादीची छपाई | दि. २० नोव्हेंबर, २०२५ (गुरूवार) |
| ६. | प्रारूप मतदार याद्यांची प्रसिध्दी | दि. २५ नोव्हेंबर, २०२५ (मंगळवार) |
| ७. | दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी (मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम १२ अंतर्गत) | दि. २५ नोव्हेंबर, २०२५ (मंगळवार) ते दि. १० डिसेंबर, २०२५ (बुधवार) |

| | | |
|---|---|---|
| ८. | दावे व हरकती निकाली काढण्याचा दिनांक व पुरवणी यादी तयार करणे व छपाई करणे | दि. २५ डिसेंबर, २०२५ (गुरूवार) |
| ९. | मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी | दि. ३० डिसेंबर, २०२५ (मंगळवार) |

मा. विभागीय आयुक्त अमरावती तथा मतदार नोंदणी अधिकारी, शिक्षक मतदार संघ यांना मतदार नोंदणी नियम १९६० च्या नियम ३१ (३) अन्वये अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाची यादी तयार करण्याकरिता जाहीर सूचना दि. ३० सप्टेंबर, २०२५ रोजी प्रसिध्द करावयाची आहे. त्याची जाहीर सुचना " Annexure - B" व First Schedule विहीत नमुन्यात प्रसिध्द करण्याबाबतच्या प्रती आपणाकडे पाठविण्यात येत आहे. **संदर्भिय पत्र क्रमांक ३ मधील दिलेल्या सूचनेप्रमाणे शिक्षक मतदार संघाच्या मतदार नोंदणीची अधिसूचनेची पहिली जाहीर प्रसिध्दी दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ रोजी जिल्हा परिषद कार्यालयाचे नोटीस बोर्डावर तसेच आपले अधिनस्त असलेल्या सर्व पंचायत समिती कार्यालयाचे नोटीस बोर्डावर व संबंधित कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्दी करण्यात यावे. उक्त सर्व कार्यालयांमधील प्रसिध्दी अहवाल संकेतस्थळावरील प्रसिध्दी अहवालासह एकत्रीत त्याच दिवशी सकाळी ११.०० वाजेपर्यंत या कार्यालयात पाठविण्यात यावा.**

सहपत्र:- " Annexure-B" व First Schedule

**(विकास मीना, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, यवतमाळ तथा**
**सहा. मतदार नोंदणी अधिकारी,**
**अमरावती विभाग शिक्षक मतदार संघ**

**प्रतिलिपी –** **मा. विभागीय आयुक्त तथा मतदार नोदंणी अधिकारी शिक्षक मतदार संघ यांना माहितीस्तव सविनय सादर.**